# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि-३/संपमूमं/२६६/२०२४
दिनांक : २४ जून, २०२४

प्रति,

प्राचार्य / केंद्राधिकारी,
संबंधित महाविद्यालये / परीक्षा केंद्रे
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

**विषय : पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या उन्हाळी-२०२४ परीक्षेबाबत.**
**संदर्भ :** (१) क्र.संगाबाअवि-३/सपमुमं/१३३/२०२४, दिनांक : ०२/०४/२०२४
(२) क्र.संगाबाअवि-३/संपमूमं/२०६/२०२४, दिनांक : २०/०५२०२४

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यांत येते की, उपरोक्त संदर्भ क्र. (१) वरील पत्रानुसार पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची उन्हाळी-२०२४ ची लेखी परीक्षा दि.२८-०५-२०२४ रोजी घेण्याबाबत जाहीर करण्यात आली होती.

तथापी, शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये सत्र-१ व २ तसेच शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये सत्र-३ व ४ ला सर्व विद्याशाखेतील बहुतांश अभ्यासक्रमांना सी.बी.सी.एस. पद्धती लागू करण्यात आलेली आहे. त्यामधील काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा योजनेत लेखी परीक्षेच्या गुणांबाबत तफावत आढळून आलेली होती. त्यामुळे संदर्भ क्र.२ वरील पत्रानुसार नवीन सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमाच्या (नियमित) विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेबाबत यथावकाश कळविण्यात येईल असे सूचीत करण्यात आले होते.

**शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये सत्र-४ ला नवीन सी.बी.सी.एस. पद्धतीमध्ये प्रवेशित (नियमित) विद्यार्थ्यांची पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची उन्हाळी-२०२४ परीक्षा ही दिनांक ०५-०७-२०२४ रोजी स.९.०० ते १२.०० या वेळेत खालील बाबीनुसार होईल.**

(१) नवीन सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमांच्या पर्यावरणशास्त्र विषयाची परीक्षा ह्या संबंधीत अभ्यासक्रमांच्या निदेशानुसार संचालित करण्यात येत आहेत.
(२) सदर परीक्षा ह्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांवर विद्यापीठामार्फत पुरविण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांनुसार घेण्यात येईल.
(३) सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे.
(४) पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिका परीक्षा केंद्रांनी प्रचलित पद्धतीने (इतर विषयांच्या उत्तरपत्रिकांप्रमाणेच) विद्यापीठात जमा करावयाच्या आहेत. सदर विषयांचे मुल्यांकन विद्यापीठाच्या केंद्रीय मुल्यांकन कार्यक्रम केंद्रात होईल.

कृपया उपरोक्त परीक्षेची सूचना लक्षात घेउन सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना याची जाणिव करून द्यावी, ही विनंती.

आपला,

(डॉ.नितीन अं.कोळी)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रति,**

१) प्रमुख, संगणक केंद्र, उपरोक्त वेळापत्रकातील दुरुस्ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.

**प्रतिलिपीः माहीती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

२) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३) मुख्य अधिकारी, केंद्रीय मुल्यांकन कार्यक्रम केंद्र
४) उपकुलसचिव (परीक्षा/चौकशी)
५) सहा.कुलसचिव (सारणी/परीक्षा/गोपनीय)

**प्रत सविनय अग्रेषित-**

मा.सदस्य, व्यवस्थापन परिषद / परीक्षा व मूल्यमापन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****